वर्ष : ०४ | अंक: १३ | मुंबई, मंगळवार २० फेब्रुवारी २०१८ ते २६ फेब्रुवारी २०१८ | पृष्ठ: ४

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

# पोलीस बातमी पत्र


POSTAL REGISTRATION NO. THW/205/2016-2018

संपादकः- दिपक मोरेश्वर नाईक | कार्यकारी संपादकः- गुरुप्रसाद दिपक नाईक

PG 2 हुक्का, रेस्टोपबना आयते अभय ?

3 → शिक्षणाची दुर्दशा चिंताजनक!

देशात लोकसंख्या कमी करण्यासाठी न्यायालयात याचिका ← 4




# मीरा-भाईंदरमध्ये रस्त्यांची अजब मलमपट्टी!

## केवळ एकाच बाजूचे काँक्रीटीकरण; दोन्ही बाजू जोडण्यासाठी ठिकठिकाणी उतार

**भाईदर- मीरा-भाईदर शहरातील अर्धवट स्थितीतील सिमेंट काँक्रीटच्या रस्त्यावर महापालिका प्रशासनाने अजब उपाय शोधून काढल्याने अपघातांना आयतेच निमंत्रण मिळत आहे. अर्धवट स्थितीतील सिमेंट काँक्रीटचे रस्ते तातडीने पूर्ण करणे आवश्यक होते. अनेक ठिकाणी केवळ रस्त्याच्या एकाच बाजूचे काँक्रीटीकरण केले आणि दुसरी बाजू तशीच ठेवण्यात आली. त्यामुळे दोन्ही बाजू वर-खाली झाल्या. याचा नागरिकांना मोठाच त्रास व्हायला लागला. त्यावर उपाय म्हणून प्रशासनाने रस्त्याच्या दोन्ही बाजू एकमेकांना जोडण्यासाठी त्यांना ठिकठिकाणी उतार केले आहेत. या उतारांमुळे अपघातांत वाढ होत आहे.**



मीरा-भाईंदर महापालिकेने शहरातील अनेक रस्ते सिमेंट काँक्रीटचे करण्याचे काम हाती घेतले आहे. यातील काही रस्ते विकासकांना टीडीआर देऊन विकसित करण्यात येत आहेत तर काही रस्ते शासनाकडून येणाऱ्या निधीतून केले जात आहेत, परंतु अनेक रस्ते सध्या अर्धवट स्थितीत आहेत. मीरा रोडच्या कनाकिया भागातील रस्ते विकासकाला देण्यात येणाऱ्या टीडीआरमध्ये समस्या निर्माण झाल्याने विकासकाने तसेच अर्धवट सोडले आहेत, तर न्यू गोल्डन नेस्ट भागातील सिमेंट काँक्रीट रस्त्याचे काम सध्या निधीअभावी बंद पडले आहे. या दोन्ही ठिकाणी रस्त्याची केवळ एकच बाजू सिमेंट काँक्रीटची बनविण्यात आली असून दुसरी बाजू तशी खडबडीत सोडण्यात आली आहे.

सिमेंट काँक्रीटची बाजू उंचावर आणि खडबडीत रस्ता त्याच्यापेक्षा खाली अशी विचित्र परिस्थिती या ठिकाणी निर्माण झाली आहे.

या रस्त्याच्या उंच-सखल स्थितीमुळे अनेक वेळा वाहनांचे अपघात होत आहेत. कनाकिया येथील शाळेतील विद्यार्थ्यांना तर याचा कायमच त्रास होत असतो. याबाबत अनेक तक्रारी प्रशासनाकडे करण्यात आल्यानंतर प्रशासनाने यावर विचित्र असा तोडगा काढला आहे. रस्त्याची सिमेंट काँक्रीटची उंचावर असलेली बाजू आणि त्याच्या तुलनेत खाली असलेली खडबडीत बाजू एका उताराने ठिकठिकाणी जोडण्यात आले आहेत, परंतु याचा उलटा परिणाम म्हणजे या उतारांमुळे अपघातांना आयतेच निमंत्रण मिळू लागले आहे. रस्त्यांच्या ठिकठिकाणच्या उतारावरून वाहने अचानकपणे दुसऱ्या बाजूवर उतरत असल्याने समोरून येणाऱ्या वाहनांना धडक देण्याचे प्रकार वाढीस लागले आहेत.

याबाबत महानगरापालिकेची बाजू समजवून घेण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाशी संपर्क साधला असता अधिकारी बैठकीत व्यग्र असल्याचे सांगण्यात आले.

# कामचुकार वाहतूक पोलिसांवर कारवाई करा!

वाहतुकीचे नियमन करणे की भ्रमणध्वनीवर गप्पा मारणे हे वाहतूक पोलिसांचे कर्तव्य आहे, असा सवाल करत वाहतूक पोलिसांच्या कारभाराचे उच्च न्यायालयाने बुधवारी वाभाडे काढले. लाचखोर वा कर्तव्यात कसूर करणाऱ्या वाहतूक पोलिसांच्या तक्रारी करणारी छायाचित्रे दक्ष नागरिकांकडून पाठवली गेली, तर त्यांची दखल घेत या पोलिसांवर कारवाई करण्याऐवजी नागरिकांचीच छळवणूक केली जात असल्याबाबतही न्यायालयाने संताप व्यक्त केला. तसेच तक्रारी करणाऱ्या नागरिकांची छळवणूक थांबवून या पोलिसांवर कारवाई करण्याचे न्यायालयाने राज्य सरकारला बजावले आहे. एवढेच नव्हे, तर तक्रारींसाठी नागरिकांना वाहतूक विभागाचे सहआयुक्त, वरिष्ठ अधिकाऱ्यांचा थेट संपर्क क्रमांकच उपलब्ध करून देण्याचेही न्यायालयाने म्हटले.



वाहतूक पोलिसांतील भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी काय उपायोजना केल्या जात आहेत याबाबतची माहिती देणारे प्रतिज्ञापत्र सादर केले. मात्र हे प्रतिज्ञापत्र समाधानकारक नसल्याचे आणि त्यात नमूद उपाययोजनांमुळे कुठल्याही स्वरूपाचा बदल होईल असे वाटत नाही, असे ताशेरे ओढत नवे तसेच सर्वसमावेशक प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश दिले आहेत. प्रामाणिकपणे हे प्रकरण हाताळण्याची गरजही न्यायालयाने बोलून दाखवली.

वाहतूक पोलिसांतील भ्रष्टाचार उघडीस आणणारे वाहतूक पोलीस सुनील टोके यांनी केलेल्या याचिकेवरील सुनावणीच्या वेळी न्यायमूर्ती सत्यरंजन धर्माधिकारी आणि न्यायमूर्ती भारती डांगरे यांच्या खंडपीठाने वाहतूक पोलिसांच्या कारभाराची लक्तरे काढली. शहरात कुठेही जा प्रत्येक चौकात वा रस्त्याच्या कडेला गप्पा मारत उभे असलेले किंवा भ्रमणध्वनीवर बोलत असलेले वा खेळत असलेले वाहतूक पोलीस दिसतात. त्यांच्या या वर्तणुकीतून हेच त्यांचे एकमेव कर्तव्य असल्याचे दिसून येते, असे न्यायालयाने सुनावले. वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करण्यासाठी जागोजागी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. मात्र हे पोलीस आपले कर्तव्य चोख बजावत आहे की कुठल्या दुसऱ्याच कामात व्यग्र आहेत हे या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये कैद होत नाही. त्यामुळे त्यावर देखरेख ठेवण्याची गरज असल्याचे न्यायालयाने म्हटले. चोख जबाबदारी न बजावणाऱ्या या वाहतूक पोलिसांवर कारवाई करायला हवी, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

# तुमच्या खात्यातील पैशांच्या मेसेजवर नजर ठेवा

**वसई : वसईत अनेकांच्या खात्यातून अचानक पैसे काढल्याच्या घटना घडल्यात. जवळपास ३० ते ४० जणांच्या खात्यातून अचानक पैसे काढण्यात आलेत. मोबाईलवर मॅसेज आल्यानंतर खातेदारांच्या ही बाब लक्षात आली.**



दरम्यान, तुमच्या खात्यातील पैसे असे अचानक काढण्यात आले आहेत, असं असेल तर १० दिवसांच्या आत संबंधित बँक शाखेत लेखी तक्रार द्या, तक्रारीची एक प्रत पोहचसह ताब्यात घ्या, कारण बँक जबाबदार असेल अशा बाबतील तुम्हाला बँक हा परतावा करू शकते, आरबीआयच्या नव्या नियमानुसार. एटीएम कार्ड जवळ असताना देखील अशाप्रकारे खात्यातून पैसे काढण्यात आलेत. प्रत्येकाच्या खात्यातून दहा ते पंधरा मिनिटाच्या अंतराने दोन ते तीनवेळा पैसे काढण्यात आलेत. विशेष म्हणजे एकाच दिवशी विविध ठिकाणाहून हे पैसे काढण्यात आलेत. दिल्ली, हरियाणा, गुढगाव या भागातून हे पैसे काढण्यात आलेत. त्यामुळे ही मोठी टोळी असण्याची शक्यता वर्तवण्यात येतंय.

# मीरा-भाईंदरचा विकास आराखडा फुटला?



- प्रस्तावित आराखडा रद्द करण्यासाठी पडद्यामागून हालचाली;
- बड्या विकासकांचा हात असल्याचा संशय

भाईंदर - मीरा-भाईंदर शहरासाठी तयार करण्यात येत असलेला नवा विकास आराखडा प्रसिद्ध होण्याआधीच फुटला असल्याची जोरदार चर्चा सध्या समाजमाध्यमांवर सुरू आहे, परंतु नव्या विकास आराखड्यामुळे शहरातील काही नामांकित विकासक अडचणीत येत असल्याने आराखडा फुटीमागे हा आराखडाच रद्द व्हावा, असे षड्यंत्र विकासकांकडून रचण्यात येत असल्याचे खात्रीलायक वृत्त आहे.

मीरा-भाईंदर शहराचा विकास आराखडा १९९७ मध्ये तयार करण्यात आला होता. दर वीस वर्षांनी आराखडा नव्याने तयार केला जात असल्याने शहराचा नवा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. हा आराखडा महासभेपुढे येऊन त्याला मान्यता मिळाली की त्यावर नागरिकांच्या हरकती आणि सूचना मागवून नंतर त्याला अंतिम स्वरूप दिले जाते. तोपर्यंत आराखड्याच्या बाबतीत गोपनीयता पाळण्यात येत असते, परंतु मीरा-भाईंदरचा विकास आराखडा अद्याप महासभेपुढे आलेला नसतानाच आराखड्यातील काही पाने नुकतीच समाजमाध्यमांवर फिरू लागली आहेत, परंतु ही पाने मीरा-भाईंदरच्या विकास आराखड्यामधलीच आहेत का हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. या पानांवर कोणा अधिकाऱ्याची सहीदेखील नाही, परंतु ही पाने मीरा-भाईंदरच्या विकास आराखड्यातीलच असल्याचा दावा केला जात असून त्याची चर्चा समाजमाध्यमांवर जोरदार रंगली आहे.

यामागे बड्या विकासकांची एक मोठी लॉबी कार्यरत झाली असल्याची खात्रीलायक माहिती सूत्रांनी दिली आहे. शासनाकडून अनेक योजनांच्या घोषणा करण्यात आल्या आहेत आणि या योजनांचा समावेश विकास आराखड्यामध्ये करण्यात आला आहे. याचा थेट फटका शहरातील काही मातब्बर विकासकांना बसला असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. या विकासकांच्या जागा शहरातील मोक्याच्या जागी असून त्यावर आरक्षणे आल्याने या जागांवर पाणी सोडण्याची वेळ या विकासकांवर ओढवणार आहे. विकासकांनी या जागा विकत घेताना त्या अगदी मातीमोल भावाने विकत घेतल्या आहेत.

## सौजन्य व्हॉट्सअप




# बटण दाबताच मीटर फास्ट!

## ■ पश्चिम उपनगरांत टोळी सक्रिय? ■ रिक्षाचालकांकडून मीटर घोटाळा?

**मुंबई-** मुंबईत रिक्षाचालकांकडे गाडीचे कागदपत्र, परवाना, बॅच नसणे नित्याचेच झाले आहे. वाहतुक विभाग दररोज शेकडो अनधिकृत रिक्षाचालकांवर गाडी जप्तीची, दंडात्मक कारवाई करतात. मुंबईत प्रवासी रिक्षाने प्रवास करीत असताना भाडे अनेकदा दुपटीने वाढण्याचे प्रकार वारंवार समोर येत आहे. प्रवासी याकडे दुर्लक्ष करून पैसे देऊन निघून जातात. मात्र, आता मीटरमध्ये फेरफार केल्याचा प्रकार जोगेश्वरीत उघड झाला असून नितीन व्यंकटेश नरळे (३४) या भांडूप येथील रिक्षाचालकाला ताब्यात घेण्यात आले आहे.



जोगेश्वरी पूर्व शामनगर येथे राहणारे सचिन खेतले हे नेहमीप्रमाणे सोमवारी रात्री कापूरबावडी (ठाणे) येथून घरी येण्यास जोगेश्वरीसाठी रिक्षा पकडली. कापूरबावडी ते जोगेश्वरी असा प्रवास सुरु झाल्यावर (कापूरबावडी) ठाणे ते कांजूरमार्ग अंदाजे १०० रुपये होतात. मात्र, सोमवारी चक्क १४० रुपये मीटरवर दाखवत होते. चालक डाव्या हाताने स्टेअरिंगखालील लाल रंगाचे बटण दाबतोय, असे सचिन यांच्या लक्षात आले.

त्यांनी रिक्षाचालकाला विचारले असता समाधानकारक उत्तर मिळाले नाही. जोगेश्वरी शामनगर येथे पोहोचल्यावर भाडे मीटरमध्ये ३६० रुपये दाखवत होते. सचिन दोन आठवड्यांपासून रिक्षाने कापूरबावडी ते जोगेश्वरी शामनगर असा प्रवास करतात. नेहमी भाडे २९५ किंवा ३००रुपये व्हायचे. शामनगरला पोहोचल्यावर त्यांनी मित्र शिवाजी खैरनार याला फोन करून बोलावून घेतले. याबाबत विचारणा केल्यानंतर रिक्षाचालकाने स्टेअरिंगखालील लाल बटणमधून वायर खेचली. पोलिसात जाणार असल्याचे सांगताच त्याने मीटरमध्ये फेरफार केल्याचे कबूल केले.

भांडूप आणि विक्रोळीमध्ये अशा दीडशे रिक्षा असल्याचे त्याने सांगितले. सोमवारी रात्री त्याला जोगेश्वरी वाहतुक पोलिस ठाण्यात नेण्यात आले. त्याला दंड करून रिक्षा जप्त करण्यात आली. जोगेश्वरी वाहतुक पोलिसांनी या अनधिकृत रिक्षावर पुढील कारवाई सुरू केली आहे. रिक्षाचालकाने दिलेल्या माहितीप्रमाणे एक टोळी कार्यरत असल्याचे त्याने सांगितले. उपनगरात असे बरेच रिक्षाचालक आहेत, त्यांनी स्वत:च्या रिक्षात मीटर भाडे वाढवण्यासाठी बटण लावले आहे, असेही सांगितले जात आहे.



# हुक्का, रेस्टोपबना आयते अभय?

**मुंबई- नियम धाब्यावर बसवत पहाटेपर्यंत सुरू राहणाऱ्या पब, रेस्टोपब, हुक्का पार्लरविरोधातील कारवाईतून मुंबई पोलिसांनी अंग काढून घेतले आहे. ज्या यंत्रणा अशा आस्थापनांना परवाने देतात त्यांनीच कारवाई करावी, अशी भूमिका पोलिसांनी घेतली आहे. तर महापालिकेने कारवाईची सर्वस्वी जबाबदारी पोलिसांची असल्याचे पत्र शासनाला धाडले आहे.**

त्यामुळे वेळ न पाळणाऱ्या आस्थापनांना वेसण कोण घालणार? याबाबत सध्या संभ्रम आहे. ही संभ्रमावस्था रात्रजीवनातील महत्त्वाचे घटक असलेल्या हुक्का पार्लर, हुक्का पुरवणारे रेस्टोपब, पब चालकांच्या पथ्यावर पडू शकते. पोलीस दल आणि महापालिकेने शासनदरबारी पत्रव्यवहार करून कारवाईबाबत एकमेकांकडे बोट दाखवल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळते. धूम्रपान क्षेत्राला (स्मोकिंग झोन) महापालिका परवानगी देते. धूम्रपान क्षेत्राचा आधार घेत रेस्टोपब चालक ग्राहकांना हुक्का पुरवतात. किंवा स्वतंत्र हुक्का पार्लर सुरू करतात. रेस्टोपब सुरू करण्यासाठी महापालिकेच्या आरोग्य विभाग, अग्निशमन दल यासह अन्य विभागांची परवानगी आवश्यक असते. याच परवान्यांमध्ये संबंधित आस्थापना रात्री किती वाजेपर्यंत सुरू राहतील याचे बंधन असते. परवाना प्रक्रियेत पोलीस कुठेच नाहीत. त्यामुळे या आस्थापना ठरलेल्या वेळेत बंद होतात की त्यानंतर सुरू राहतात हे पाहून कारवाई करण्याची जबाबदारी महापालिका व परवाना देणाऱ्या यंत्रणांची आहे. पालिकेने धूम्रपान क्षेत्राच्या अटी-शर्ती किंवा नियमांनुसार या आस्थापनांविरोधात कारवाई करावी, अशी सूचना पोलिसांनी गृहविभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिवांना लिहिलेल्या पत्रात नमूद आहे. त्यावर महापालिकेने शासनाला पत्र धाडून कारवाईची जबाबदारी सर्वस्वी पोलिसांची आहे. मुंबई पोलीस कायदा, भारतीय दंड विधान, सिगारेट आणि अन्य तंबाखूजन्य पदार्थ प्रतिबंधक कायद्यानुसार पोलिसांना कारवाईचे अधिकार प्राप्त आहेत.



# विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी शालेय बसमध्ये 'आसनपट्टे'

**मुंबई- शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या बसमधील आसनांना पट्टे (सीटबेल्ट) बसवण्यात यावेत, अशी सूचना मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाने केली आहे. अशा आसनपट्ट्यांची व्यवस्था करण्यासाठी बसबांधणी कंपन्यांना सूचना करावी, असे आदेशही प्राधिकरणाने परिवहन आयुक्तांना दिले आहेत. मात्र, आसनपट्टे बसवण्याच्या निर्णयास शालेय बस संघटनांनी विरोध केल्याने या मुद्द्यावर नवीन वादंग होण्याची शक्यता आहे.**

मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाची नुकतीच बैठक झाली. शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनामध्ये विद्यार्थ्यांसाठी आसनपट्टे लावण्याबाबतही चर्चा करतानाच उत्पादक कंपन्यांना कळविण्याबाबतही परिवहन आयुक्तांना सूचना करण्यात आली आहे. परिवहन विभागातील सूत्रांनी सांगितले की, परिवहन आयुक्तांना यासंदर्भात सूचना करण्यात आली आहे. त्यानुसार समिती नेमण्याचेही आदेश देण्यात आले आहेत. समितीकडून सीटबेल्ट लावण्यासंदर्भात अहवाल तयार केला जाईल. नवीन शालेय बस गाड्यांमध्ये सीटबेल्ट लावतानाच जुन्या शालेय बसमध्येही सीटबेल्ट लावणे योग्य ठरेल का याबाबतचा अहवाल तयार करण्यात येणार आहे आणि त्यानंतरच पुढील निर्णय घेतले जाणार असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान, वेगनियंत्रक न बसवलेल्या अथवा



त्यात फेरफार करून चालवण्यात येणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्याबाबतही बैठकीत चर्चा करण्यात आली. यामध्ये १ ऑक्टोबर २०१५ पूर्वी नोंदणीकृत झालेल्या स्कूल बस, घातक वस्तू वाहून नेणारी वाहने, डंपर्स आणि टँकर्सकडून नियम धाब्यावर बसविले जात असल्याने त्यावर कारवाई करण्याचे मुद्दे मांडण्यात आले. त्यातही वेग नियंत्रकाबाबतीत स्कूल बसेसचे वाहन मालक आणि चालक वेग नियंत्रक तोडणे, त्यात फेरफार करणे, ते नादुरुस्त अवस्थेत ठेवणे, त्याचे कार्य बंद करण्याचे प्रकार करत असल्याची बाब निदर्शनास आली आहे. त्यामुळे शालेय विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका पोहोचवणारी ही बाब असून हे गैरप्रकार रोखण्यासाठी परवानाधारकाविरोधात कठोर कारवाई करणे आवश्यक असल्याचे पुढे आले.

# किनारपट्टीचा ऱ्हास!



**मुंबई-** मुंबईच्या सागरी किनारपट्टीवर वाढलेल्या विकासकामांमुळे गेल्या पाच वर्षांत शहरातील सर्व किनाऱ्यांची मोठ्या प्रमाणात धूप झाल्याची माहिती यंदाच्या 'महाराष्ट्र तटरेखा व्यवस्थापन' अहवालातून उघड झाली आहे. दादर किनारपट्टीचा ऱ्हास सर्वाधिक झपाट्याने होत असून गिरगाव, वसरेवा, जुहू, अक्सा आणि गोराई येथील किनाऱ्यांची धूप वाढत असल्याचे या अहवालात नमूद करण्यात आले आहे. याबाबतचे संशोधन करणाऱ्या सिंगापूर येथील खासगी संस्थेने धूप रोखण्यासाठी प्राथमिक स्तरावर उपाययोजना करण्याची सूचना दिली असली तरी येत्या काळात मुंबईजवळ समुद्रात उभे राहणारे छत्रपती शिवाजी स्मारक, कोस्टल रोड अशा प्रकल्पांमुळे किनारे अधिक आक्रसण्याची भीती व्यक्त होत आहे. मुंबईला अंदाजे ११४ किमी लांबीचा समुद्रकिनारा लाभला आहे. वालुकामय, खडकाळ आणि खारफुटींनी वेढलेल्या या किनारपट्टीची धूप होण्याची प्रक्रिया गेल्या पाच वर्षांत अधिक वेगवान झाली आहे. हीच बाब महाराष्ट्र सागरी मंडळाच्या 'तटरेखा व्यवस्थापन अहवाल २०१७'मधून स्पष्ट होत आहे. 'वॉचडॉग फाऊंडेशन' या स्वयंसेवी संस्थेने अहवाल जाहीर झाल्याची माहिती दिली आहे. किनारपट्टींचा अभ्यास करण्याच्या दृष्टिकोनातून 'महाराष्ट्र सागरी मंडळा'ने सिंगापूर येथील 'सेंच्युरी बीच प्रा.लि.' या संशोधन संस्थेला कंत्राट दिले होते.

# बत्तीस हजार अंगणवाडी सेविकांच्या नोकरीवर गदा!

**मुंबई-** राज्यातील कुपोषित बालकांचा प्रश्न हा प्रामुख्याने अंगणवाड्यांच्या सक्षमीकरणावर अवलंबून असताना दोन लाख अंगणवाडी सेविकांपैकी पंधरा टक्के म्हणजे सुमारे ३२ हजार अंगणवाडी सेविकांची कपात करण्याचा प्रस्ताव वित्त विभागाने मांडला आहे. त्याचप्रमाणे सध्या ६५ वयापर्यंत काम करणाऱ्या अंगणवाडी सेविकांच्या सेवेचे वय ६० करण्याचा निर्णय घेण्यात आला असून याचा मोठा फटका या अंगणवाड्यांमध्ये पोषणापासून आरोग्य सेवेसाठी येणाऱ्या हजारो बालकांना बसण्याची भिती या क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्त्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे. महिला व बाल विकास विभागाच्या 'एकात्मिक बाल विकास सेवा योजनां'चे बळकटीकरण करून कुपोषणाच्या समस्येचा सामना करण्याची



गरज असताना गेल्या तीन वर्षांत सातत्याने सरकारने या योजनांच्या निधीमध्ये कपात केल्याचे अर्थसंकल्पाच्या पाहाणीतून दिसून येते. गेल्या तीन वर्षांत तब्बल १४४३ कोटी रुपयांच्या निधीची कपात करण्यात आली असून त्याचा मोठा फटका अंगणवाडी सेविकांचे मानधन, पोषण आहाराचा निधी, शैक्षणिक व सबंधित साहित्य, अंगणवाड्यांचे भाडे आणि अमृत आहार योजनांना बसत असल्याचे 'राज्य अंगणवाडी कर्मचारी कृती समिती'च्या शुभा शमीम यांनी सांगितले.

# डिझेल दरवाढीमुळे एसटी आणखी तोट्यात

**मुंबई-** इंधन दरवाढीमुळे गेल्या तीन महिन्यांत वाहनचालकांच्या खिशाला कात्री लागत असतानाच एसटी महामंडळालाही त्याची मोठी किंमत मोजावी लागली आहे. एसटी महामंडळाच्या ताफ्यात डिझेलवर धावणाऱ्या बस गाड्या आहेत. डिझेलच्या किमतीत सातत्याने वाढ झाल्याने त्याचा फटका महामंडळाला बसला असून इंधनापोटी ४१ कोटी ५८ लाख रुपये जादा मोजावे लागले आहेत. एसटी महामंडळाला आधीच दोन हजार ४०० कोटी रुपयांचा संचित तोटा सहन करावा लागत आहे. गेल्या वर्षी हाच तोटा दोन हजार कोटी रुपयांपर्यंत होता. कामगारांचा पगार, टायरवर खर्च याबरोबरच इंधन दरवाढ तोटात मोठी भर पडत जाते. डिसेंबर महिन्यापासून पेट्रोल, डिझेलच्या किमतीत सातत्याने वाढ होत आहे आणि त्याचाच फटका महामंडळाला बसू लागला आहे. महामंडळाला दिवसाला १२ लाख १२ हजार ५०० लिटर डिझेल लागते. या डिझेलचा पुरवठा इंडियन ऑइल कंपनीकडून होतो. नोव्हेंबर महिन्यात प्रतिलिटर ५७.९८ या दराने डिझेल



महामंडळाने विकत घेतले. त्यानंतर डिसेंबर महिन्यात ५९.५९ रुपये मोजावे लागले. यासंदर्भात एसटी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक रणजित सिंह देओल यांच्या मोबाक्षवर संपर्क साधला असता त्यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही. नोव्हेंबर महिन्याच्या तुलनेत डिसेंबर महिन्यात एसटी महामंडळाला १३ कोटी ८ लाख १६ हजार ६२५ रुपये डिझेलसाठी जादा किंमत द्यावी लागली.

# लोकलच्या महिला बोगीत शौचालय उभारा- सावंत



**मुंबई-** उपनगरीय लोकल मध्य रेल्वेवर छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) ते कल्याण-कसारा-कर्जत आणि पश्चिम रेल्वेवर डहाणूपर्यंत धावते. यामुळे महिला प्रवाशांसाठी लोकलच्या महिला बोगीत शौचालय उभारण्याची मागणी शिवसेनेचे खासदार अरविंद सावंत यांनी केली आहे. सीएसएमटी येथे मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक डी.के.शर्मा यांनी खासदारांची बैठक गुरुवारी बोलावली होती. यावेळी सावंत यांनी ही मागणी केली. बैठकीत मुंबई रेल्वे विकास मंडळाचे अधिकारी देखील उपस्थित होते. उपनगरीय लोकलला जर एसी बसवता येणे शक्य आहे. तर महिला बोगीत शौचालय का बसवले जात नाही? असा प्रश्न सावंत यांनी बैठकीत उपस्थित केला. चर्चगेट ते विरार,डहाणू आणि सीएसएमटी ते कसारा-कर्जत जाण्यासाठी दोन-तीन तास लागतात. यामुळे महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने लोकलमध्ये शौचालयांसाठी जागा करावी. त्याच बरोबर स्थानकांवरील पादचारी पूलांना पूर्व-पश्चिम जोडणी द्यावी अशी ही मागणी सावंत यांनी केली. सीएसएमटी येथे शिवाजी महाराजांचा पुतळा फलाट क्रमांक १८ जवळ उभारण्याच्या रेल्वेच्या निर्णयावर अरविंद सावंत यांनी नाराजी व्यक्त केली.

# महिला अधिकाऱ्यांना सासू-सासऱ्यांच्या आजारपणासाठी बदलीची सवलत

**मुंबई-** राज्य शासनाच्या सेवेतील महिला अधिकाऱ्यांना आपल्या सासू-सासऱ्याच्या गंभीर आजारपणाच्या काळात त्यांची शुश्रूषा करण्यासाठी महसुली विभाग बदलून घेण्याची सवलत मिळणार आहे. त्यानुसार महसुली विभाग वाटप नियमांत तशी सुधारणा करण्याचा निर्णय बुधवारी राज्य मंत्रिमंडळाने घेतला. या निर्णयामुळे अनेक गरजू



महिला अधिकाऱ्यांना दिलासा मिळणार आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत किंवा निवड मंडळमार्फत शासकीय सेवेत निवड झालेल्या गट अ आणि गट ब (राजपत्रित व अराजपत्रित) अधिकाऱ्यांच्या तसेच पदोन्नती मिळालेल्या अधिकाऱ्यांच्या पहिल्या नियुक्त्या कुठे करायच्या याबाबत राज्य सरकारने २०१५ मध्ये एक धोरण ठरविले आहे. त्याला महसुली विभाग वाटप नियम २०१५ असे म्हटले जाते. २८ एप्रिल २०१५ ला राज्य शासनाने अधिसूचना काढून, त्याबाबतचे नियम जाहीर केले होते. या नियमानुसार शासकीय सेवेत नव्याने निवड झालेल्या अधिकाऱ्यांच्या नागपूर, अमरावती, औरंगाबाद व नाशिक या महसुली विभागात चक्राकार पद्धतीने नियुक्त्या करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार गट अच्या अधिकाऱ्यांना त्यांना वाटप करण्यात आलेल्या विभागात सहा वर्षे व गट बच्या अधिकाऱ्यांना नऊ वर्षे सेवा करणे बंधनकारक करण्यात आले. पदोन्नतीने पहिली नियुक्ती याच पद्धतीने करण्यात येत आहे. त्यात गट अच्या अधिकाऱ्यांना तीन वर्षे व गट बच्या अधिकाऱ्यांना सहा वर्षे सेवा करणे अनिवार्य करण्यात आले.

# सातव्या वेतन आयोगामुळे ३० हजार कोटींचा बोजा?

**मुंबई-** लोकसभा व विधानसभा निवडणुकांच्या तोंडावर राज्यातील कर्मचाऱ्यांना खूश करण्यासाठी सातवा वेतन आयोग लागू करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. आगामी अर्थसंकल्पात त्यासाठी नाममात्र (टोकन) तरतूद करून कर्मचाऱ्यांना तसा शुभसंदेश देण्यात येणार आहे. सुमारे १७ लाख अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीचा आणि सहा हजारांहून अधिक निवृत्त कर्मचाऱ्यांच्या निवृत्तिवेतनाचा वर्षाला २५ ते ३० हजार कोटी रुपयांचा बोजा पडेल, असा अंदाज आहे. मंत्रालयातील एका उच्चपदस्थ अधिकाऱ्याने ही माहिती दिली. राज्यात शासकीय व जिल्हा परिषदांमधील अधिकारी-कर्मचाऱ्यांची १० लाख ५४ हजार संख्या आहे. पोलीस, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मिळून १७ लाख कर्मचारी होतात. राज्यात सध्या ६ लाख ३५ हजार निवृत्त कर्मचाऱ्यांची संख्या आहे. केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे राज्यात १ जानेवारी २०१६ पासून सातवा वेतन आयोग लागू करण्याच्या कर्मचारी व अधिकारी संघटनांच्या मागणीनुसार त्याचा अभ्यास करून शासनाला शिफारशी करण्यासाठी माजी सनदी अधिकारी के. पी. बक्षी यांच्या अध्यक्षतेखाली वेतन सुधारणा समिती स्थापन करण्यात आली आहे.

# रिक्षाचालकांची मनमानी; इलेक्ट्रॉनिक मीटरमध्ये फेरफार, प्रवाशांकडून उकळतात जास्त पैसे

**मुंबई-** साध्या मीटरमध्ये फेरफार करून भाडे वाढण्याच्या तक्रारी आल्यानंतर परिवहन प्राधिकरणाने इलेक्ट्रॉनिक मीटर बसवण्याची सक्ती केली होती. मात्र, आता इलेक्ट्रॉनिक मीटरमध्येही फेरफार करत प्रवाशांची लूट सुरू असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. मुंबई



शहरासह उपनगरात १००पेक्षा जास्त रिक्षा आणि सुमारे ५० टॅक्सींमधील इलेक्ट्रॉनिक मीटरमध्ये फेरफार करत प्रवाशांकडून जास्त पैसे उकळले जात असल्याची माहिती समोर आली आहे. जोगेश्वरी येथील सिव्हिल इंजिनीअर असलेल्या सचिन खेतले यांनी मंगळवारी रात्री ठाण्यातील कापूरबावडी येथून जोगेश्वरी येथील श्यामनगर येथे जाण्यासाठी रिक्षा केली.

सामान्यपणे ठाणे ते कांजूरमार्ग या टप्प्यापर्यंत सुमारे १०० रुपये इतके भाडे होते. मात्र, या वेळी १४० रुपये झाल्यावर सचिनला संशय आला. या दरम्यान कापूरबावडी येथून रिक्षा जोगेश्वरीच्या दिशेने मार्गस्थ झाल्यानंतर रिक्षाचालक डाव्या हाताने हँडलखालील बटन प्रेस करतोय, असे त्याच्या लक्षात आले. सचिनने हटकले असता त्याने असमाधानकारक उत्तर दिले. श्यामनगरला पोहोचल्यावर मीटरवर ३६० रुपये भाडे दिसले. सामान्यपणे कापूरबावडी ते श्यामनगर टप्प्यात ३०० रुपये भाडे होते. याबाबत विचारल्यावर रिक्षाचालकाने उडवाउडवीची उत्तरे दिली.



# फेरीवाला क्षेत्रासाठी फक्त १६६० सूचना

**मुंबई-** शहरातील हजाराहून अधिक रस्त्यांवर फेरीवाल्यांसाठी ८६ हजार जागा उपलब्ध करण्यासंदर्भात महापालिकेने संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेल्या यादीवर मुदतीअखेर केवळ १६६० सूचना व हरकती आल्या आहेत. या क्षेत्रांसंबंधी सूचना देण्याची १५ फेब्रुवारी ही अखेरची तारीख होती. या सूचनांचा अभ्यास करून त्यानुसार यादीत बदल करण्यात येतील. शहरातील लोकसंख्येच्या अडीच टक्के लोकांना पदपथविक्रेते म्हणून मान्यता देण्यात यावी, असे सर्वोच्च न्यायालयाने निर्णयात म्हटले होते. राज्य सरकारनेही याबाबत निर्णय घेतल्यावर शहरात पदपथविक्रेत्यांना मान्यता देण्याबाबत प्रक्रिया सुरू करण्यात आली. मात्र तब्बल चार वर्षांनंतर एल्फिन्स्टन पूलाच्या दुर्घटनेनंतर या प्रक्रियेला वेग आला आहे. महापालिकेने तीन वर्षांपूर्वी नोंदवलेल्या तसेच नव्याने आखण्यात आलेल्या तब्बल ८५ हजार ८९१ जागांची माहिती डिसेंबर महिन्यात संकेतस्थळावर देण्यात आली. परिसरातील रस्त्यांवर फेरीवाल्यांना जागा देण्याबाबत नागरिकांनी सूचना व हरकती पाठवणे अपेक्षित होते. महानगरपालिकेकडे ९९ हजार ४३५ फेरीवाल्यांकडून नोंदणीसाठी अर्ज आले असून त्यांची छाननी सुरू आहे.

# समृद्धी महामार्गाचे काम पावसाळ्यानंतर

**मुंबई-** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प म्हणून ओळखल्या जाणाऱ्या व सुमारे ४६ हजार कोटी खर्चाच्या बहुचर्चित मुंबई-नागपूर शीघ्रसंचार द्रुतगती (महाराष्ट्र समृद्धी) महामार्गाच्या बांधणीतील आणखी एक अडथळा दूर झाला आहे. या प्रकल्पाच्या वित्तीय निविदांसाठीची भूसंपादनाची अट राज्य सरकारने शिथील केल्यानंतर राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) या प्रकल्पातील पहिल्या १३ टप्प्यांसाठी २१ हजार ८९२ कोटी रुपये खर्चाच्या वित्तीय निविदा काढल्या असून त्यासाठी २१ कंपन्यांमध्ये चढाओढ आहे. ही निविदा प्रक्रिया पूर्ण होण्यास काही कालावधी लागणार असल्याने प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम पावसाळ्यानंतर सुरू होईल, असे महामंडळातील सूत्रांनी सांगितले.

मुंबई-नागपूर या शहरांमधील ७१० किलोमीटरचा प्रवास सहा तासांवर आणणाऱ्या 'समृद्धी द्रुतगती महामार्गासाठी आवश्यक जमिनींपैकी आतापर्यंत ६२ टक्के जमीन महामंडळाच्या ताब्यात आली आहे. सरकारच्या धोरणानुसार कोणत्याही रस्ते



प्रकल्पासाठी १०० टक्के जमीन ताब्यात आल्याशिवाय कामाचे कार्यादेश देऊन नयेत, अशी अट होती. मात्र समृद्धी महामार्गासाठी जमीन देण्यास शेतकऱ्यांचा होणारा विरोध लक्षात घेऊन ही अट ५० टक्क्यांपर्यंत शिथिल करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. त्यानुसार महामंडळाने आता नागपूर ते नाशिकदरम्यानच्या १३ पॅकेजसाठी वित्तीय निविदा काढल्या असून निविदा भरण्याची अंतिम तारीख २८ मार्च आहे. या १३ टप्प्यांमध्ये सुमारे ६०० किलोमीटर लांबीच्या महामार्गाची बांधणी करण्यात येणार असून त्यासाठी २१ हजार ८९२ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. प्रत्यक्ष काम सुरू झाल्यानंतर ३० महिन्यांत या महामार्गाचे काम पूर्ण करण्यात येणार असून हे काम करणाऱ्या कंपन्यांवर संबंधित रस्त्यांच्या देखभालीची चार वर्षांची जबाबदारी टाकण्यात आली आहे.

# मुंबई शिल्लक तरी राहील का?

## उच्च न्यायालयाने व्यक्त केली चिंता, झाडांचीही कत्तल



**मुंबई-** कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३च्या कामासाठी शहरात कुठे ना कुठे तरी खोदकाम केले आहे. या कामासाठी बेसुमार झाडांची कत्तल करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर उच्च न्यायालयाने भविष्यात मुंबई थोडीतरी शिल्लक राहील का, की मुंबईत केवळ मेट्रो-३च उरेल, असा टोला राज्य सरकार व मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (एमएमआरसीएल)ला गुरुवारी लगावला. मेट्रो-३च्या कारशेडसाठी राज्य सरकारने आरे कॉलनीतील २५ हेक्टर जागा एमएमआरसीएलला देण्यासंदर्भात ऑगस्ट २०१७मध्ये अधिसूचना काढली. या अधिसूचनेला एका एनजीओने उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. संबंधित भूखंड 'ना-विकास क्षेत्र' म्हणून जाहीर करण्यात आला होता. मात्र, कारशेडसाठी या भूखंडाचे 'विकास क्षेत्रा'त रूपांतर करण्यात आले. आरेमध्ये कारशेड बांधल्यास मोठ्या प्रमाणावर वन्यजीवसृष्टी व हरित पट्टा नष्ट होईल. त्यामुळे आरे कॉलनीऐवजी हे कारशेड कांजुरमार्ग येथे हलविण्यात यावे, अशी मागणी एनजीओने जनहित याचिकेत केली आहे. त्यावरील सुनावणी न्या. एस. सी. धर्माधिकारी व न्या. भारती डांग्रे यांच्या खंडपीठापुढे होती. प्रस्तावित बांधकामामुळे वन्यजीवसृष्टीचे व हरित पट्ट्याचे किती नुकसान होणार आहे, याची माहिती न्यायालयाने एमएआरसीएलला पुढील सुनावणीत देण्याचे निर्देश दिले. जमीन ताब्यात घेण्यासंदर्भात आवश्यक असलेल्या सर्व कायदेशीर प्रक्रिया पार पाडल्याची माहिती एमएआरसीएलने प्रतिज्ञापत्राद्वारे न्यायालयाला दिली.

## संपादकीय...

# शिक्षणाची दुर्दशा चिंताजनक!



संपादक:-
दिपक मोरेश्वर नाईक

**ज्ञान, व्यवहारकौशल्य आणि शहाणपण देते, ते खरे शिक्षण; परंतु दुर्दैवाने शिक्षण केवळ उपयुक्ततेच्या तराजूत तोलले जाते. त्यामुळेच आपल्या शिक्षणव्यवस्थेत पूर्वीपासूनच अनेक त्रुटी आणि विसंगती आढळतात. मुले पास होतात, वरच्या वर्गात जातात; परंतु त्यांचे ज्ञान, गुणवत्ता आणि कौशल्य वाढते का, हा मुद्दा फारसा विचारात घेत नाही. केवळ पास होणे किंवा चांगले गुण मिळविणे हेच शिक्षणाचे ध्येय होऊन बसले आहे. वस्तुतः अनेक गोष्टींचे आकलन होणे, हे शिक्षणाचे ध्येय असायला हवे. दुर्दैवाने आपल्याकडे तसे घडताना दिसत नाही. शहरी भागात थोडी बरी स्थिती असली, तरी ग्रामीण भागात अत्यंत दयनीय अवस्था दिसून येते. 'ॲन्युअल स्टेटस ऑफ एज्युकेशन रिपोर्ट' (एएसईआर) हा २०१७ चा जो अहवाल समोर आला आहे, त्यात अत्यंत धक्कादायक अशा काही बाबी पाहायला मिळतात, त्या यामुळेच. या अहवालातील तथ्ये आणि आकडेवारी भयभीत करणारी आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास आणि त्यातून राष्ट्रविकास साधण्याचे शिक्षण हे माध्यम मानले जाते; परंतु आपण सुशिक्षित होत असताना अगदी औपचारिक गोष्टीही पूर्ण करीत नाही, असे या अहवालाकडे पाहून वाटते. अहवालानुसार, ग्रामीण भागातील १४ ते १८ वर्षे वयोगटातील मुलांना अगदी प्राथमिक गोष्टींचे ज्ञान नाही, असे दिसून आले आहे. देशाचे सुजाण नागरिक म्हणून आपल्याला थक्क करणारी बाब म्हणजे या वयोगटातील १४ टक्के मुलांना आपल्या देशाचा नकाशाही ओळखता आला नाही. ३६ टक्के मुलांना देशाची राजधानी कोणती हे माहीत नसल्याचे निदर्शनास आले, तर २१ टक्के मुलांना आपण कोणत्या राज्यात राहतो, हे सांगता आले नाही.**



**'एएसईआर'च्या माध्यमातून २००६ पासून देशातील शिक्षणाच्या परिस्थितीविषयी दरवर्षी अहवाल सादर करण्यात येतो. आतापर्यंत ५ ते १६ वर्षांपर्यंतच्या मुलांना सर्वेक्षणात सहभागी करून घेतले जात होते. २०१७ मध्ये केवळ १४ ते १८ वर्षे वयोगटातील मुलांच्या 'ज्ञाना'चा अभ्यास करण्यात आला. अहवालात ज्या अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत, त्यातील एक म्हणजे, आठवी ते बारावी या वर्गांत शिकणाऱ्या एक चतुर्थांश विद्यार्थ्यांना पैसे मोजता येत नाहीत. एवढेच नव्हे, तर ४४ टक्के चार ते पाच अंकांची बेरीज करू शकत नाहीत. ४० टक्के विद्यार्थी घड्याळात किती वाजले, हे तास आणि मिनिटांमध्ये सांगू शकत नाहीत. सुमारे ७६ टक्के विद्यार्थी साधा सोपा हिशेब करू शकत नाहीत. देशाकडे असलेल्या प्रचंड युवाशक्तीच्या बळावर जगात अव्वल स्थान मिळविण्याचे स्वप्न पाहणाऱ्या या देशात २५ टक्के विद्यार्थी आपल्या मातृभाषेतील पुस्तकही धड वाचू शकत नाहीत, हा चिंतेचा तसेच चिंतनाचा विषय आहे. १४ ते १८ वर्षे वयोगटातील बहुतांश विद्यार्थ्यांची स्थिती अशी असेल, तर पुढील आयुष्यात त्यांच्यात किती योग्यता आणि गुणवत्ता असेल, हा भयभीत करणारा प्रश्न ठरतो. शिक्षणाचा पायाच एवढा ढिसाळ असेल, तर या विद्यार्थ्यांचे उच्चशिक्षण कसे असेल, याची कल्पनाच न केलेली बरी! शिक्षणाच्या दर्जा आणि परिस्थितीविषयी जी स्थिती प्रत्यक्ष जमिनीवर दिसून येते, त्यासंबंधीचा हा अहवाल आपल्याला विचारप्रवण करणारा आहे. भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशात शिक्षण हेच एकमेव असे साधन आहे, ज्या माध्यमातून मनुष्यबळ योग्य आणि संवेदनशील बनविले जाऊ शकते. प्राथमिक शिक्षणाचीच ही अवस्था असेल, तर असे शिक्षण घेऊन उच्च शिक्षण घेतलेल्या तरुणांची गुणवत्ता रोजगाराच्या दृष्टीने किती उपयुक्त असेल, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. उच्च दर्जाचे शिक्षण केवळ साक्षरतेसाठी नव्हे, तर जनजागृतीसाठी, सामाजिक-आर्थिक विषमता दूर करण्यासाठी, तसेच बालमजुरीची समस्या कमी करण्यासाठीही उपयुक्त आहे, हे आपण कसे विसरतो? म्हणजेच, अनेक समस्यांना एकमेव उत्तर म्हणजे शिक्षण आहे. 'एएसईआर' अहवालात जे मुद्दे नमूद केले आहेत, ज्या कमतरता दाखवून दिल्या गेल्या आहेत, त्या दूर करण्यासाठी लवकरात लवकर पावले टाकावी लागतील. देशातील प्राथमिक शिक्षणाच्या गुणवत्तेत वाढ करणे ही केवळ सरकारची जबाबदारी नाही. समाजानेही त्या दृष्टीने आपली जबाबदारी ओळखली पाहिजे. देशातील शिक्षणाची परिस्थिती लपून राहिलेली नाही. 'एएसईआर'च्या अहवालाने केवळ धूसर चित्रच सादर केले असून, खरी परिस्थिती याहून भयानक आहे, हे सर्व जण जाणतात. त्यामुळे या अहवालात जे मुद्दे दिले आहेत, त्यावर लवकरात लवकर काम सुरू व्हायलाच हवे. शिक्षणाच्या दुरवस्थेच्या समस्येचा मुळात जाऊन विचार केल्यास शाळांची स्थिती आणि शिक्षकांची गुणवत्ता सुधारणे हेच प्राथमिक उपाय दिसतात. म्हणजेच, जशी आपल्याला समस्या माहीत आहे, तसाच पर्यायही माहीत आहे. आता गरज आहे, ती केवळ इच्छाशक्तीची!**

# मालदीव... सध्या भारताची डोकेदुखी

जेमतेम चार लाखांची लोकसंख्या आणि कसाबसा २९८ चौरस किलोमीटर इतकाच आकार. तरी नखुरड्याएवढे मालदीव हे राष्ट्र सध्या भारताची डोकेदुखी बनले आहे. ही डोकेदुखी अनेक अर्थांनी. एक तर या देशातील सध्याच्या अशांततेत आपली भूमिका काय, हा प्रश्न. याआधी या देशातील अशांततेत १९८८ साली राजीव गांधी यांनी सैन्य धाडून मध्यस्थी केलेली. त्या वेळी भारताची भूमिका या देशासाठी महत्त्वाची ठरली होती. तेव्हा आताही भारताने लष्करी हस्तक्षेप करायला हवा, अशी एका वर्गाची मागणी. ती मान्य करावी तर भलतीच आफत आणि न करावी तर ५६ इंचांचे काय, हा प्रश्न. आणि काहीही करायचे नाही म्हटले तर सर्व काही गिळंकृत करावयास टपलेला चीन नावाचा बुभुक्षित शेजार. त्याने काही करणे म्हणजे पुन्हा आपल्या निष्क्रियतेस उघडे पाडणे. पण म्हणून त्यास रोखण्याचा प्रयत्न करायचा तरी पंचाईतच. एक तर थेट संघर्षाची शक्यता. वर पुन्हा तिसऱ्या एखाद्या देशासाठी आपली डोकेदुखी इतकी वाढवून घ्यावी का हाही प्रश्न. अशा वेळी कोणताही शहाणा देश करेल तेच आपण केले. मालदीवकडे सरळ दुर्लक्ष केले. हा झाला तात्पुरता उपाय. मालदीवमध्ये या काळात शांतता नांदण्याची सुतराम शक्यता नसल्याने तो पुन्हा पुन्हा आपल्याला भेडसावत राहणार, हे नक्की. भांडखोर शेजाऱ्यांच्या कचाट्यात सापडलेल्या नेमस्त शेजाऱ्यासारखी आपली स्थिती त्यामुळे पुन्हा समोर येत राहणार. त्या घरात घुसून आपण ना भांडणाऱ्यांना दोन रट्टे देऊ शकतो ना त्याकडे दुर्लक्ष करू शकतो. म्हणून ही डोकेदुखी समजून घ्यायला हवी.

२०१२ सालच्या फेब्रुवारी महिन्यात या कथित लोकशाही देशाचा अध्यक्ष महंमद नशीद हा मालदीवची राजधानी माले येथील भारतीय दूतावासात आश्रय घेऊन राहिला तेव्हापासून या देशातील समस्या वाढत गेल्या. आपल्याला जबरदस्तीने पदत्याग करावा लागला, असे त्याचे म्हणणे. तो करावयास लावणारी व्यक्ती म्हणजे अब्दुल्ला यामीन. या यामीन यांनी त्या वेळच्या वादग्रस्त निवडणुकांत बाजी मारली. वास्तविक त्या वेळी पहिल्या फेरीत नशीद यांना अधिक मते मिळाल्याची वदंता होती. परंतु सर्वोच्च न्यायालयाने ही निवडणूक रद्दबातल ठरवली आणि यामीन यांनी नशीद यांना तुरुंगात डांबण्याचा आदेश दिला. ही तुरुंगवासाची शिक्षा १३ वर्षांची होती आणि या काळात त्यांना निवडणूक लढविण्यासही बंदी केली गेली. त्या वेळी नशीद यांनी भारताकडे मदतीची याचना केली. त्या वेळी पहिल्यांदा या घरच्या भांडणात पडण्यास आपण नकार दिला आणि मालदीवमधील परिस्थितीकडे सरळ दुर्लक्ष केले. त्यात अर्थातच शहाणपण होते. त्या वेळी आपण केले ते इतकेच. ते म्हणजे नशीद यांच्या सुटकेसाठी रदबदली केली. आरोग्याच्या कारणासाठी नशीद यांची अखेर सुटका केली गेली. लंडन येथे ते उपचारासाठी जाणे अपेक्षित होते. प्रत्यक्षात ते श्रीलंकेत गेले आणि तेथून देशातील राजकारणात उचापती करीत राहिले. पुढे नशीद आणि यामीन यातील संघर्षाचा पुढचा अध्याय लिहिला गेला. मालदीवमधील सर्वोच्च न्यायालयाने यामीन यांना अपात्र ठरविण्याचा घाट घातला. तसे होणार असल्याचे वृत्त स्थानिक वर्तमानपत्रांनी दिल्यानंतर




यामीन यांनी ॲटर्नी जनरल महंमद अनिल यांना सर्वोच्च न्यायालयात धाडले आणि अध्यक्ष बरखास्तीचा निणर्य घेतल्यास त्याचे गंभीर परिणाम होतील असा इशारा दिला. ती एक प्रकारे धमकीच होती. त्यानंतर त्यांनी सैन्याकरवी पार्लमेंटलाच वेढा घातला. विरोधी खासदारांनी पार्लमेंटमध्ये जमून आपल्यावर अविश्वास ठराव आणू नये अथवा अपात्र ठरवू नये यासाठी केली गेलेली ही प्रतिबंधित कृती होती. त्यामुळे विरोधकांची चांगलीच मुस्कटदाबी झाली. यामीन इतकेच करून थांबले नाहीत. त्यांनी सर्वोच्च न्यायालयालाच लक्ष्य केले. आपले सरकार बरखास्त करण्याचा आदेश दिल्याचा आरोप करीत यामीन यांनी देशाचे सरन्यायाधीश आणि आणखी एका न्यायाधीशालाच अटक केली. याचबरोबर देशात त्यांनी आणीबाणीही लागू केली. ही आणीबाणी पंधरा दिवसांसाठी असणे अपेक्षित आहे. देशातील दोन महत्त्वाच्या लोकशाही संस्था, पार्लमेंट आणि सर्वोच्च न्यायालय, यामीन यांनी आपल्या मुठीत घेऊन देशावर आपला पूर्ण एकछत्री अंमल लागू केला. या टप्प्यावर अमेरिका ते युरोप या टप्प्यातील सर्वच देशांनी चिंता व्यक्त करून पाहिली. पण त्यामुळे काहीही फरक पडला नाही. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीही या काळात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी चर्चा केली. परंतु या चर्चेत निष्पन्न काय झाले आणि तिचे फलित काय हे अद्याप तरी गुलदस्त्यात आहे. यामीन यांच्या या दट्ट्यानंतर सर्वोच्च न्यायालयास वास्तवाचे भान आले आणि त्यांनी विरोधकांची सुटका करण्याचा आदेश मागे घेतला. अध्यक्ष यामीन यांनी आपल्या विरोधकांना देशद्रोही ठरवण्याचे चातुर्य एव्हाना दाखवले होतेच. हे जगातील अनेक देशांत जे सुरू आहे त्यानुसारच झाले. देशाच्या सत्ताप्रमुखास विरोध म्हणजे देशविरोध असे मानण्याची प्रथा अलीकडच्या काळात अनेक देशांत दिसू लागली असून मालदीवनेदेखील त्याची चुणूक दाखवली. आपली डोकेदुखी सुरू झाली ती या टप्प्यावर. देशांतर्गत दुफळी मिटविण्यासाठी भारतीय हस्तक्षेपाची मागणी या काळात वाढू लागली.

तो म्हणजे चीन. दरम्यानच्या काळात चीनने या आपल्या आणखी एक शेजारी देशात उत्तम जम बसवला असून सध्या मालदीव हा देश चिनी पर्यटकांचे प्रमुख आकर्षण केंद्र बनलेला आहे. २०१० साली अवघे सव्वा लाख चिनी पर्यटक मालदीवला भेट देऊन गेले. परंतु २०१५ साली ही संख्या पावणेचार लाखांवर गेली असून पुढे तीत सातत्याने वाढच होताना दिसते. २०१४ साली तर चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांनी या देशास भेट दिली. त्या वेळी १०० बड्या चिनी उद्योग प्रमुखांचे शिष्टमंडळ त्यांच्या समवेत होते. विमानतळ, पायाभूत सोयीसुविधा, आर्थिक मदत अशा अनेक आघाड्यांवर चीनने या देशास आपलेसे केले असून तो देश जवळजवळ चीनचा मिंधे होण्याच्या बेतात आहे. जिनपिंग यांनी मालदीव आणि चीन यांना जोडणारा विशेष सामुद्रीमार्गदेखील प्रस्तावित केला असून तो समुद्रात भराव घालून पूर्ण केला जाणार आहे. यासाठी मालदीवने घटनादुरुस्तीदेखील केली. आधीच्या नियमानुसार तेथे बिगर मालदिवीस जमीन खरेदी करता येत नाही. परंतु चीनसाठी या नियमात बदल केला गेला आणि ९९ वर्षांच्या कराराने जमिनी परकीयांना भाड्याने देण्याचा मार्ग काढला गेला. अशा वेळी भारताने तेथे हस्तक्षेप करणे म्हणजे चीनला आव्हान देणे होय. ते आपण टाळले. यामागे अर्थातच डोकलाम आदी मुद्दे असतीलच. त्यामुळे आणखी एका आघाडीवर चीनला आव्हान देणे कितपत शहाणपणाचे असा प्रश्न दिल्लीत चर्चिला गेला असल्यास नवल नाही. परंतु हा शहाणपणा दाखवत किती काळ स्वस्थ राहता येईल हादेखील प्रश्नच आहे. कारण अर्थातच चीन. या निमित्ताने तो देश आणखी एका देशास गिळंकृत करून आपल्याभोवतीचा वेढा अधिकच घट्ट करताना दिसतो. त्यामुळे हे छोटे शेजारी देश म्हणजे आपल्यासाठी असून अडचण आणि नसून खोळंबा मात्र नाही, असे ठरतात. त्यामुळे परराष्ट्र नीती हे आव्हान ठरते.

# अरुंद रस्त्यामुळे वसई पूर्वेत वाहतूक कोंडी

**वसई – वसई पूर्वेला औद्योगिक वसाहत मोठ्या प्रमाणात असूनही या ठिकाणी अरुंद रस्ता असल्याने त्याचा फटका कारखान्यांतील कर्मचारी आणि परिसरातील नागरिकांना बसत आहे. औद्योगिक वसाहतीमुळे येथे नेहमीच वाहनांची वर्दळ असते. मात्र अरुंद रस्त्यामुळे मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असते. वाहतूक विभाग आणि वसई-विरार महापालिकेकडून मात्र याकडे दुर्लक्ष झालेले असल्याची संतप्त प्रतिक्रिया परिसरातील नागरिकांनी दिलेली आहे.**



वसई पूर्वेत मुंबई, ठाणे, पालघर जिल्ह्यांतून नोकरदार, कारखानदार येत असतात. त्याशिवाय अनेक अवजड वाहने धावत असतात. मात्र या ठिकाणी रेल्वे स्थानकातून बाहेर पडल्यावर नागरिकांना कोंडीला सामोरे जावे लागते. त्यानंतर वाहने पकडून कंपनीचा रस्ता धरावा लागतो. त्याचबरोबर सायंकाळी घरी जाणाऱ्या चाकरमान्यांना बराच वेळ कोंडीत अडकून राहावे लागत असल्याने घरी जाण्यास उशीर होतो. पर्यायी रस्ता नसल्याने औद्योगिक वसाहतीत जाणारी अवजड वाहनेही याच मार्गाचा अवलंब करत असल्याने कोंडीत अधिक भर पडत आहे. वसई रोड पूर्व येथील पेट्रोलपंप-वाघरीपाडा-वसई रोड स्थानकापर्यंतचा रस्ता हा अरुंद असल्यामुळे रोज सकाळ व संध्याकाळच्या सुमारास येथे प्रचंड वाहतूक कोंडी होत असते. वसई रोड पूर्व रेल्वे स्थानकाबाहेर वेगवेगळे चार ते पाच रिक्षा स्टॅण्ड, फेरीवाल्यांचा बस्तान आणि परिवहनच्या ३० फुटांपेक्षा मोठ्या बसमुळे नाहक वाहतूक कोंडी होत असते. या कोंडीचा त्रास सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी आणि नोकरदार वर्गाला होतो. नवघर पूर्व येथे होत असलेल्या वाहतूक कोंडीबाबत पालिकेने पर्यायी मार्गाचा विचार केला आहे, मात्र त्याचे काम अद्याप पूर्ण झाले नाही.

***पूल होणार कधी?***

**नवघर पूर्वेला अग्निशमन दलाला कोणती दुर्घटना घडली तर अरुंद रस्त्यामुळे अडथळा निर्माण होत असतो. राजवली-दिवाणमान खाडीवरील निर्माणाधीन पूल सध्या अपूर्ण अवस्थेत आहे. या पुलाचे बांधकाम २०१३-१४ ला सुरू करण्यात आले होते. दोन्ही बाजूंचे गर्डर टाकून काम बंद करण्यात आले. हा पूल १८ महिन्यांत पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र अजून पुलाचे काम अपूर्णावस्थेत आहे. या प्रकल्पासाठी ३ कोटी १० लाख ७४२ रुपये खर्च मंजूर करण्यात आला होता.**

# ठाणे पोलिसांना हवेत ५ हजार कर्मचारी



**ठाणे - शहरीकरणाबरोबर लोकसंख्याही झपाट्याने वाढली असून गुन्ह्यांचा आलेखही कमी होत नाही. मात्र त्या प्रमाणात पोलिसांचा फौजफाटा वाढत नसल्याने कायदा आणि सुव्यवस्था राखताना पोलिसांना मोठी कसरत करावी लागते. ठाणे पोलिस दलात अधिकारी अधिकारी आणि कर्मचारी मिळून दहा हजारांच्या आसपास कर्मचारी असले तरी आणखी पाच हजारांहून अधिक पोलिस कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. याबाबतचा सुधारित प्रस्तावत काही दिवसांपूर्वी पोलिस महासंचालक कार्यालयाकडे पाठवण्यात आलेला आहे.**

ठाणे पोलिस आयुक्तालयात पाच परिमंडळ असून पोलिस ठाण्यांची संख्या ३५ आहे. त्याबरोबर गुन्हे शाखा, विशेष शाखा, वाहतूक शाखा आदी अनेक शाखा आहेत. नेहमी काही ना काही छोटे-मोठे गुन्हे घडत असतात. या गुन्ह्यांबरोबर गुन्हेगारी टोळ्यांच्याही हालचालींवर पोलिसांना लक्ष ठेवावे लागते. रस्त्यावरील गुन्हे रोखण्याची मोठी जबाबदारी पोलिसांवर असते. काही वेळा आंदोलनाला हिंसक वळण लागते. अशा वेळी मोठ्या प्रमाणावर पोलिस कर्मचाऱ्यांची गरज भासते. पोलिसांना इतरही प्रशासकीय कामे असतात. मोर्चे, धरणे तसेच सण, उत्सवातही पोलिसांना चोख बंदोबस्त ठेवावा लागतो. व्हीआयपींनाही पोलिस सुरक्षा पुरवली जाते. वाहतुकीचे नियोजन करण्याची मोठी जबाबदारी वाहतूक शाखेवर असते. आजघडीला पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत ठाणे, कल्याण-डोंबिवली, अंबरनाथ, भिवंडी, उल्हासनगर आदी मोठी शहरे असून या शहारांची लोकसंख्या सुमारे ७० ते ८० लाखांच्या आसपास आहे. लोकसंख्या वाढली मात्र पोलिसांची संख्या वाढत नसल्याचे दिसते. सध्या ठाणे पोलिस दलात नवीन २३८ पोलिस शिपाई पदांची भरतीप्रक्रिया सुरू झाली असून ही पदे ३१ डिसेंबर २०१८ अखेरपर्यंत रिक्त होणाऱ्या पदांच्या संख्येनुसार ही नवीन पदे भरण्यात येणार आहेत. चालू वर्षाच्या अखेरपर्यंत १६६ पोलिस कर्मचारी सेवानिवृत्त होत आहेत.

ही पदे भरल्यानंतरही संख्याबळाचा प्रश्न सुटणार नाही. १९८१ मध्ये ठाणे पोलिस आयुक्तालयाची कर्मचाऱ्यांची २ हजार ५८३ पदे मंजूर होती. यामध्ये एएसआय, एचसी, पीएन आणि पीसी या पदांचा समावेश आहे. मात्र २०१८ पर्यंत या पदात वाढ होत आता कर्मचाऱ्यांच्या मंजूर पदांची संख्या ९ हजार ७५ इतकी आहे. मागील ३६ वर्षांत ६ हजार ४९२ इतक्या पदांची वाढ झाल्याचे दिसून येते. मात्र वाढणारे गुन्हे तसेच कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी ठाणे पोलिस दलात आणखीन कर्मचाऱ्याची गरज आहे. सध्या कर्मचाऱ्यांची संख्या ८ हजार ८८७ इतकी असून एक हजाराच्या आसपास अधिकारी आहेत. म्हणजेच दहा हजाराच्या आसपास ठाणे पोलिसांचा फौजफाटा आहे. मात्र आणखी ५ हजार ३८६ कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. याबाबतचा प्रस्ताव ठाणे पोलिसांनी पोलिस महासंचालक कार्यालयाकडे पाठवला असल्याचे समजते.

# बांगलादेशातून बनावट नोटा ठाण्यात!

## दोन हजार व ५०० रुपयांच्या नव्या नोटांचा समावेश

ठाणे - निश्चलनीकरणाने बनावट नोटांना पायबंद बसेल, हा केंद्र सरकारचा दावा फोल ठरल्याचा प्रत्यय पुन्हा आला आहे. ठाण्यातील वागळे इस्टेटमधील धर्मवीर परिसरात नव्या दोन हजार आणि ५०० रुपयांच्या तब्बल दोन लाख ३१ हजार रुपयांच्या बनावट नोटा खंडणीविरोधी पथकाने जप्त केल्या आहेत. या प्रकरणी एकाला अटक झाली असून, या नोटा बांगलादेशातून झारखंडमार्गे ठाण्यात आणल्याची माहिती तपासात पुढे आली आहे.



प्रकाश प्रसाद ऊर्फ शंकर टोकल माहतो (४२, रा. झारखंड) असे अटक झालेल्या आरोपीचे नाव आहे. तो महिनाभरापासून या परिसरात राहत होता. २४ लाख रुपयांच्या बनावट नोटा तो विकणार असल्याची माहिती ठाणे खंडणीविरोधी पथकाला मिळाली होती. याआधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रदीप शर्मा, पोलीस निरीक्षक राजकुमार कोथमिरे यांच्या पथकाने मंगळवारी रात्री सापळा रचून त्याला अटक केली. त्याच्याकडे दोन हजारच्या ११३, पाचशेच्या १०, शंभरच्या दोन बनावट नोटा सापडल्या. झारखंडच्या हजारीबाग जिल्ह्यतील हेमलाल पंडित या मित्राकडून त्या विकत घेतल्याची माहिती त्याने पोलिसांना दिली. हेमलाल याचा शोध आता सुरू असून, त्याच्या अटकनेनंतर बनावट नोटा पुरविणारी मोठी साखळी उघड होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# शाळा विश्वस्ताच्या पत्नीची ७९ विद्यार्थ्यांना मारहाण

***ठाण्यातील गौतम प्राथमिक-माध्यमिक विद्यालयातील प्रकार; पालकांमध्ये संताप***

ठाणे - शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनाची तयारी करताना वर्गात मोठा आवाज झाला म्हणून संतापलेल्या शाळेच्या विश्वस्तच्या पत्नीने विद्यार्थ्यांना प्लॅस्टिकच्या दांड्याने बेदम मारहाण केल्याचा धक्कादायक प्रकार ठाण्यात उघडकीस आला आहे. या प्रकारात तब्बल ७९ विद्यार्थ्यांना मारहाण झाल्याचे पालकांकडून सांगण्यात येत असून त्यापैकी १८ विद्यार्थ्यांची जिल्हा शासकीय रुग्णालयात वैद्यकीय तपासणी करण्यात आली आहे. या विद्यार्थ्यांमध्ये काहींचे हाताचे हाड मोडले , तर काहींना मुका मार लागला आहे. या घटनेमुळे संतापलेल्या पालकांनी ठाणेनगर पोलीस ठाण्यात धाव घेतली आहे. दरम्यान, याप्रकरणी शाळेचे विश्वस्त आशीष गौतम आणि त्यांची पत्नी शिल्पा या दोघांशी वारंवार संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद आला नाही.



ठाणे स्थानक परिसरातील प्रभात सिनेमागृहाजवळील एका तीन मजली इमारतीमध्ये हिंदू मिशन एज्युकेशन सोसायटी या संस्थेद्वारे गौतम प्राथमिक-माध्यमिक विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालय चालविण्यात येते. ही शाळा हिंदी आणि इंग्रजी माध्यमाची असून या ठिकाणी ठाणे, कळवा तसेच आसपासच्या परिसरांतील विद्यार्थी शिकतात. ठाणे येथील गडकरी रंगायतनमध्ये येत्या २८ फेब्रुवारीला शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित करण्यात आले आहे. त्याच्या तयारीत आवाज झाल्यामुळे शाळेच्या विश्वस्तची पत्नी शिल्पा गौतम हिने विद्यार्थ्यांना मारहाण केली. स्नेहसंमेलनाची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांबरोबरच त्या मजल्यावर असलेल्या इतर वर्गातील विद्यार्थ्यांनाही मारहाण करण्यात आली. या मारहाणीबाबत माहिती मिळाल्यानंतर पालकांनी ठाणेनगर पोलीस ठाण्यात धाव घेतली. मात्र, तिथे शाळेचे विश्वस्त आशीष गौतम हे आले आणि त्यांनी माफी मागत दुसऱ्या दिवशी पालकांची बैठक बोलावली.

त्या वेळेस त्यांची पत्नी उपस्थित नसल्यामुळे पालक संतापले आणि त्यांनी पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविण्यासाठी पुन्हा धाव घेतली, अशी माहिती एका पालकाने दिली. काँग्रेसच्या विद्यार्थी संघटनेचे राज्याचे महासचिव अक्षय कोळीही यांनीही या प्रकरणी ठाणेनगर पोलिसांना पत्र देऊन गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. मार लागलेल्या १८ विद्यार्थ्यांनी जिल्हा शासकीय रुग्णालयात वैद्यकीय तपासणीसाठी पाठविण्यात आले असून याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असलल्याचे ठाणेनगरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मंदार धर्माधिकारी यांनी सांगितले.

# अविवाहित मृत मुलाच्या वीर्यापासून आईने मिळवली जुळी नातवंडे



**पुणे-अविवाहित मुलगा प्रथमेश पाटील ऐन तारुण्यात सत्ताविसाव्या वर्षी ब्रेन ट्यूमरने गेला. मृत्यूपूर्वी डॉक्टरांनी या तरूणाचे वीर्य गोठवून ठेवले होते. त्याची आई राजश्री यांनी उसने गर्भाशय मिळवत (सरोगसी) या वीर्यापासून जुळी नातवंडे मिळवली. यात एक मुलगा व एक मुलगी आहे. त्यापैकी मुलाचे नाव प्रथमेश तर मुलीचे नाव प्रीशा ठेवण्यात आले. हा अनोखा प्रकार पुण्यात घडला. उच्चशिक्षणासाठी पुण्यातून जर्मनीत गेलेल्या प्रथमेशच्या मेंदूत कॅन्सरची गाठ असल्याचे निदान २०१३ मध्ये झाले. त्याच्यावर किरणोत्सर्गाचे उपाय करावे लागणार होते.**

या उपायांमुळे प्रथमेशच्या प्रजोत्पादन क्षमतेवर दुष्परिणाम होण्याची शक्यता होती. त्यामुळे जर्मनीतल्या डॉक्टरांनी प्रथमेशला वीर्य साठवून ठेवण्याची सूचना केली. त्यास प्रथमेशने मान्यता दिल्यानंतर 'क्रायोप्रिझर्व्हेशन' पद्धतीने त्याचे वीर्य जतन केले. नंतर प्रकृती स्वास्थ्यात कर्करोग विषयक गुंतागुंत निर्माण झाली. यातच सप्टेंबर २०१६ मध्ये तरुणाचा पुण्यात मृत्यू झाला. मुलगा अकाली गेल्यानंतर त्याच्या आई राजश्री यांनी जर्मनीतल्या संबंधित वीर्यपेढीशी संपर्क साधला. आवश्यक तांत्रिक बाबी पूर्ण करुन मुलाचे जतन केलेले वीर्य मिळवले. त्यानंतर उसन्या गर्भाशयाचा शोध सुरु झाला. संबंधित तरुणाच्या चुलत बहिणीनेच 'सरोगेट' मातृत्व पत्करण्याचा निर्णय घेतला. बहिणीच्या स्त्रीबीजांची चाचणी झाली. मृत प्रथमेशच्या पुरुषबीजाशी ती जुळल्याने डॉक्टरांनी प्रयोगशाळेत भ्रूण निर्मिती केली. भ्रूणाचे रोपण गर्भात करण्यात आले. नऊ महिने पूर्ण झाल्यानंतर सोमवारी संबंधित स्त्रीने दोन बाळांना जन्म दिला. ही प्रसूती करणाऱ्या डॉ. संगीता पुराणिक म्हणाल्या, 'जतन केलेले वीर्य फेब्रुवारी २०१७ मध्ये काळजीपूर्वक पुण्यात आणले. योग्य गर्भाचा शोध घेतला. वीर्यापासूनची पुरुष व स्त्रीबीजाचे प्रयोगशाळेत फलन करुन चार भ्रूण तयार केले.' दरम्यान, मृताच्या मूळ पेशी, वीर्य, प्रत्यारोपण करता येतील असे अवयव शास्त्रोक्त पद्धतीने जतन करुन ठेवण्याची पद्धत पाश्चिमात्य देशांमध्ये आहे.

# उद्धव ठाकरेंकडून नाणार प्रकरणी जनतेची दिशाभूल - राणे

**मुंबई-** नारायण राणे यांनी पत्रकार परिषद घेऊन शिवसेनेवर हल्लाबोल केलाय. तसेच मुख्यमंत्री आणि उद्धव ठाकरे यांची भेट कशासाठी झाली यावरही त्यांनी आपलं मत मांडलंय. त्यासोबतच नाणार प्रकल्पाबाबत त्यांची भूमिकाही त्यांनी स्पष्ट केलीये. नारायण राणे म्हणाले की, 'नाणार हा प्रकल्प आल्यास कोकणातून शिवसेना हद्दपार होईल, या भीतीने ते काल मुख्यमंत्र्यांना भेटले. माझा उद्धव ठाकरेंना प्रश्न आहे उद्योग खाते सुभाष देसाई यांच्याकडे आहे आणि जमीन संपादन करण्यासाठी याच खात्याकडून होते आहे. मग तुमच्या उद्योग मंत्र्यांना सांगून नाणार प्रकल्पाची परवानगी रद्द का करत नाहीत. पर्यावरण खाते शिवसेनेचे रामदास कदम यांच्याकडे आहे, ते पर्यावरणाची परवानगी रद्द का करत नाहीत. उद्धव ठाकरे हे न करता मुख्यमंत्र्यांना का भेटतात. नाणारबाबतचा करार मॅग्नेटिक महाराष्ट्रात करण्याचा निर्णय आठ दिवसांपूर्वी करण्याचा निर्णय झाला. या करारावर उद्योगमंत्री सही करणार आहेत. मग आठ दिवसांपूर्वीच हा करार रद्द का केला नाही. आता मुख्यमंत्र्यांना भेटून उद्धव ठाकरे जनतेची दिशाभूल करतायत. हा प्रकल्प आंध्र मधून कोकणात आणला. त्यासाठी विनायक राऊत यांनी जागा दाखवण्याचे मुख्यमंत्र्यांनी विधिमंडळात सांगितले आहे. आता लोक विरोधात जात आहेत तर ही दिशाभूल केली जात आहे. मी हा प्रकल्प होऊ देणार नाही. हा प्रकल्प कोकण उद्ध्वस्त करणारा आहे. जनतेच्या आरोग्याच्या दृष्टीनेही हा प्रकल्प घातक आहे. त्यामुळे मी हा प्रकल्प कदापि होऊ देणार नाहीत. मीही मुख्यमंत्र्यांकडे वेळ मागितला आहे, प्रकल्पाला विरोध करणाऱ्या स्थानिकांना घेऊन भेटणार आहे.



# जज साहेब, मला होळी खेळण्यासाठी तरी सोडा हो!

**झारखंड-** मकरसंक्रांतीच्या दिवशी तुरुंगातच तिळकूट खावं लागलेल्या लालूप्रसाद यादव यांनी होळी तुरुंगात साजरी करावी लागू नये म्हणून न्यायाधीशांपुढे गयावया केली आहे. चारा घोटाळ्यातील



दोषी लालूंच्या घरातील होळी ही मोठ्या धूमधडाक्यात साजरी केली जाते. यंदा मात्र लालू प्रसाद यादव यांना होळीच्या उत्सवाला मुकावं लागण्याची शक्यता आहे, कारण त्यांचा मुक्काम रांचीतील तुरुंगात असून होळी खेळण्यासाठी मला सोडा अशी विनंती त्यांनी केली आहे. लालू प्रसाद यादव यांनी न्यायालयाला विनंती केली आहे की त्यांच्याविरोधात दाखल करण्यात आलेल्या खटल्यांचा वेगाने निपटारा केला जावा आणि त्यांना होळी खेळण्याची परवानगी देण्यात यावी. दुमका इथल्या सरकारी कोषागारातून अवैधरित्या पैसे काढल्याप्रकरणी सध्या लालूंविरोधात खटला सुरू आहे. लालूंनी विनंती केली आहे की या प्रकरणाचा निपटारा लवकरात लवकर करण्यात यावा जेणेकरून मला होळी खेळता येईल.

न्यायालयात लालू आणि न्यायाधीशांमध्ये झालेला संवाद कोर्टात उपस्थित प्रत्येकजण कान लावून ऐकत होता. लालूंना उद्देशून न्यायाधीश शिवपाल सिंह म्हणाले की तुम्ही चांगले अधिकारी सोबत ठेवले नाहीते. यावर लालू प्रसाद यादव म्हणाले की सिस्टमच खराब आहे. यावर न्यायाधीशांनी लालूंना टोमणा मारत म्हटलं की जर तुम्ही ठरवलं असतं तर सिस्टीम सुधारू शकते. यानंतर लालू प्रसाद यादव म्हणाले की मला तुरुंगात पाठवल्याने तुमचं बरंच नाव झालंय. यावर न्यायाधीश म्हणाले की त्यामुळे नाही तर लालू प्रसाद यादव यांच्यामुळे त्यांचे नाव झाले आहे. यावर लालू म्हणाले मग आता तरी माझ्यावर दया करा.

# पुण्यात व्हॉट्सअॅपच्या स्टेटसमुळे १४ वर्षीय शाळकरी मुलाची निर्घृण हत्या

**पुणे-** चाकणमध्ये १४ वर्षीय शाळकरी मुलाची व्हाट्सअॅप स्टेटसवरून आणि कुत्रा असे संबोधल्यावरून निर्घृण हत्या करण्यात आली आहे. या घटनेत एक मुलागा जखमी झाला आहे. अनिकेत शिंदे असे हत्या झालेल्या मुलाचे तर ओंकार बिसनाळे असे जखमीचे नाव आहे. याप्रकरणी आठ आरोपी पैकी तिघांना पोलिसांनी अटक केली आहे. अनिकेत, ओंकार आणि सर्व आरोपी एकाच गटातील होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत अनिकेत शिंदे आणि आरोपी यांनी मिळून काहींना मारहाण ही केली होती, तसा त्यांच्यावर गुन्हा दाखल आहे. मात्र काही दिवसांपूर्वी यांच्यात फूट पडली आणि यांच्यात वैर निर्माण झाले. मग व्हॉट्सअॅपवर समोरच्या पेक्षा स्वतःचे स्टेटस वरचढ असले पाहिजे. लक्ष केंद्रित केले गेले. एकाने 'द किंग' असा स्टेटस ठेवला तर दुसरा



'आपुणच बादशहा' असा स्टेटस ठेवायचा. त्यातच मयत अनिकेत शिंदेने दोन दिवसापूर्वी ओंकार झगडेला फोन केला होता त्यात, आम्हाला जाता येता कुत्रा असे का म्हणता असा जाब ओंकार झगडेला अनिकेतने विचारला असता तुम्हाला कुत्रा नाही तर काय म्हणायचे तुम्ही आता दुसऱ्या गटाचे आहात, असे म्हटला.

त्यांच्यात फोनवरून शिविगाळ करत बाचाबाची केली. राग मनात धरून गुरुवारी अनिकेतला ओंकारने फोन केला आणि मला तुला भेटायचे आहे असे सांगितलं तर अनिकेतने संग्राम दुर्ग भुईकोट किल्ल्यात बोलावले. त्यानुसार अनिकेत शिंदे, रामनाथ उर्फ टिल्या सुखदेव घोडके, ओंकार मनोज बिसनाळे हे किल्ल्यात आले. आरोपी ओंकार झगडे आणि किरण धनवटे हे पिस्तूल आणि कोयता घेऊन आले.



# देशात लोकसंख्या कमी करण्यासाठी न्यायालयात याचिका

**नवी दिल्ली–** देशाची वाढती लोकसंख्या हा चिंतेचा विषय असताना आता हा मुद्दा चक्क कोर्टाच्या पायरीवर पोहोचलाय. लोकसंख्या नियंत्रित करण्यासाठी कडक कायदा करण्यात यावा, यासाठी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आलीये. दोन मुलांपेक्षा जास्त मुले असू नयेत, तीन मुलं असणा-यांचे सर्व सरकारी लाभ काढून घ्यावेत, तीन अपत्य असलेल्या पित्याचा मतदारानाचा अधिकार रद्द करावा, लोकसंख्या कमी करण्यासाठी काय प्रयत्न केले यासंदर्भात सरकारकडून कागदपत्रं मागवावीत अशा मागण्या या याचिकेत करण्यात आल्यात. अॅड अनुज सक्सेना, अॅड प्रिया शर्मा, अॅड पृथ्वीराज चौहान यांनी ही याचिका केलीये. यावर पुढल्या आठवड्यात सुनावणी होणार आहे.

# हॉटेल, पबवर अबकारी विभागाचीही नजर हवी!

**मुंबई-** हॉटेल्स, रेस्तराँ आणि पबना परवानगी देताना घालण्यात येणाऱ्या अटींची त्यांच्याकडून योग्यप्रकारे अंमलबजावणी केली जाते की नाही हे पाहण्याची जबाबदारी ही केवळ पालिकेचीच नाही, तर अबकारी विभागाचीही आहे, असे सुनावत कमला मिलमधील आगीप्रकरणी उच्च न्यायालयाने बुधवारी राज्य सरकारलाही धारेवर धरले.

ज्या हॉटेल्स, रेस्तराँ वा पबमध्ये मद्य उपलब्ध करण्यास परवानगी दिली जाते, त्यांच्याकडून अटी-नियमांचे पालन केले जाते की नाही याची वारंवार तपासणी करणे ही अबकारी विभागाची जबाबदारी तसेच कर्तव्यही आहे, असेही न्यायमूर्ती आर. एम. बोर्डे आणि न्यायमूर्ती राजेश केतकर यांच्या खंडपीठाने बजावले. कमला मिलमधील 'वन अबव्ह' आणि 'मोजो बिस्त्रो' या पबना लागलेल्या आगीची न्यायालयीन चौकशीची मागणी करणारे मुंबईचे माजी पोलीस आयुक्त ज्युलिओ रिबेरो यांच्या याचिकेवरील सुनावणीच्या वेळी खंडपीठाने अबकारी विभागाला धारेवर धरले.

# भाईंदरमध्ये शिवरायांचे छायाचित्र पदाधिकाऱ्यांच्या रांगेत




वार्ताहर

## भाजपाने लावलेल्या बॅनरवरून वादंग

भाईंदर, दि. १७ – नगरचे भाजपाचे उपमहापौर श्रीपाद छिंदम यांनी छत्रपती शिवाजी महाराजांविरुध्द अवमानकारक वक्तव्य केल्यावरून सर्वत्र संतापाचा आगडोंब उसळला असतानाच मीरा भाईंदरमध्ये भाजपाच्या वतीने लाव- लेल्या बॅनरमध्ये महाराजांचे छायाचित्र चक्क पदाधिकाऱ्यांच्या रांगेत टाकल्याने रिपब्लिकन सेना, मराठी एकीकरण समिती, मनसे आदिंनी निषेध करत गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. हा वाद वाढू लागताच अखेर पोलिसांनी बॅनर काढायला लावला आहे.

सिल्वर पार्क जंक्शनवर तोडलेल्या इमारतीच्या होर्डिंगवर भाजपाच्या वतीने शिवजयंतीनिमीत्त शुभेच्छा देणारा लांब बॅनर लावला आहे. या बॅनरवर प्रंतप्राधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, आमदार नरेंद्र मेहता, भाजपा जिल्हाध्यक्ष हेमंत म्हात्रे व महापौर डिंपल मेहता यांची छायाचित्रे एका बाजुला तर दुसऱ्या बाजुला भाजपा नगरसेवक अरविंद शेट्टी, भाजपाचे संजय थरथरे व फिरोज शेख यांची छायाचित्र आहेत. महापौर व शेट्टी यांच्या छायाचित्राच्या मध्यभागी शिवरायांचा फोटो आहे.

छत्रपति शिवाजी महाराज देशाचे आराध्य दैवत आहे. ऑर्केस्ट्रा बार - लॉज चालवणारया व वेश्या व्यवसायप्रकरणी पीटाचा गुन्हा दाखल असलेल्या नगरसेवक अरविंद शेट्टी सह आ. मेहता, थरथरे, शेख आदी गुन्हे दाखल असलेल्या वादग्रस्तांच्या रांगेत महाराजांना स्थान देण्याच्या निषेधार्थ मराठी एकीकरण समितीचे गोवर्धन देशमुख, रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष रोहित आसले, शिवमावळाचे नामदेव काशिद, मनसेचे दिनेश कनावजे आदींनी आवाज उठवला. या बेकायदा बॅनरमुळे महाराजांचा अवमान झाला असुन आमच्या भावना दुखावल्या आहेत. या प्रकरणी संबंधितांविरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी करत सर्व बॅनर लाव- लेल्या ठिकाणी जमले. मीरारोड पोलिस घटनास्थळी आले. दरम्यान अरविंद शेट्टी व आंदोलकांमध्ये बाचाबाची झाली. महाराजांचा अवमान करुन अरेरावी शेट्टी याने केल्याचे सांगत त्याची तक्रार पोलीसात केल्याचे काशिद म्हणाले.







हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं.३-४, अमीन इंडस्ट्रियल इस्टेट, सोनावला क्रॉस रोड नं.४, गोरेगांव (पूर्व), मुंबई - ४०० ०६३ येथे छापून २, राजाराम को.ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - ४०१ १०५ येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत)